I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 393-396 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal Original Article
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# मानवी हक्क व माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासीक पार्श्वभूमी

प्रा.जनार्धन प्रकाश पिंपळकर

एम.ए. समाजशास्त्र/ राज्यशास्त्र (एम.एड)
डॉ.खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 01.04.2022

**संदर्भ :**

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून मानवी हक्क आणि माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी यातून विद्यार्थ्यांच्या विचारशक्ती मध्ये तसेच त्यांच्या हक्काची जाणिव यातून व्हावी व सामाजिक राजकीय प्रक्रिये संबंधीत ज्या पद्धती किंवा मानवी हक्काच्या जाणिवेचा प्रभाव हा विशिष्ट रूपाने मानवी कल्याणाविशयीची माहिती तसेच माहितीचा अधिकार २००५ या कायद्याची मानवी ज्ञानामध्ये आणि वैचारीक तत्वाच्या माध्यमातून योग्य त्या भुमिका निभावण्यासाठी मानवी हक्काच्या घटकांची पार्श्वभूमी जाणून घेणे महत्वाचे ठरते. राजकीय क्षेत्रामध्ये मानवी हक्क आणि माहितीच्या अधिकार कायद्याची जी भुमिका आहे ती अत्यंत महत्वपुर्ण कायद्याची पार्श्वभूमी यातून जागृतता निर्माण करणे महत्वाचे ठरताना दिसून येईल.

**बिजशब्द** — मूलभूत हक्क, आंतरराष्ट्रीय इतिहास, गुप्ततेचे धोरण.

**प्रस्तावना:**

मानवी मुलभूत हक्कांचा सगळयात मोठा शत्रु भेदभाव आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. त्यामुळे मुलभूत हक्कांची अमंजबजावणी योग्य अशी त्यांची भुमिका होती. व्यक्तीला मुलभूत अधिकार असतात. आणि ते अबाधित राखण्याची जबाबदारी शासनावर असते. मानवी कल्याण व विचार लोकशाही तत्वज्ञानाचाच भाग होय हया दृष्टीने मुलभूत अधिकार म्हणजेच मानवी हक्क किंवा नैसर्गिक हक्क होत. भारताच्या संविधानात मुलभूत अधिकारांच्या जाहिरनाम्याचा समावेश असावा हा विचार १८९५ मध्ये ॲनी बेंझट यांनी त्या वर्षाच्या कॉंग्रेस अधिवेशनात मांडला व तेव्हापासून तो सातत्याने मांडला गेला १९२८ साली कॉंग्रेस पक्षाने भारताच्या संविधानाची रूपरेषा सुचविण्याकरिता पंडित नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमली तिनेही संविधानात मुलभूत अधिकाराची हमी देणाऱ्या तरतुदी समाविष्ठ कराव्यात असे सुचविले. १९३१ च्या कराची कॉंग्रेसमध्ये मुलभूत अधिकारांचा ठराव पं.जवाहरलाल नेहरू यांनी मांडला. स्वतंत्र भारताच्या संविधानात मुलभूत अधिकार असावेत हा निर्णय घटना समितीने एकमताने घेतला अनुसूची १२ ते ३५ हयात मुलभूत अधिकारांच्या तरतुदी समाविश्ठ आहेत. हयाला संविधानाचा तिसरा भाग म्हटले जाते भारतीय नागरिकांना मिळालेला माहितीचा अधिकार हा सहज मिळालेला नाही माहितीचा अधिकार मिळण्याचा प्रवास अनेक व्यवहारिक अडथळयांनी भरलेला होता. ब्रिटीश शासनातील कायद्याचे राज्य नियमबाहय नोकरीशाही व स्वतंत्र न्यायपालिका यांचा वारसा भारतीय प्रशासनाला जरी मिळाला असला तरी ब्रिटीश शासनाप्रमाणेच भारतीय प्रशासन जनतेपासून दुरच राहिले.

१९४६ मधील संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून जगभरात सजग माहितगार नागरिक असलेला गुणवत्ताप्रधान समाज निर्माण करण्याच्या दिशेने धोरण आखणिला सुरवात झाली. यादृष्टीने जगभर प्रयत्न चालु आहेत संयुक्त राष्ट्रसंघाबरोबरच युरोपियन युनियन, राष्ट्रकुल मंडल, युनेस्को, वंसुधरा परिषद यासारख्या संस्थाबरोबरच जागतिक बॅंक आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यासारख्या वित्तीय संस्थांनी माहितीच्या अधिकाराचे आंतरराष्ट्रीय धोरण आखण्यात महत्वाची भुमिका बजावली आहे.

भारतामध्ये माहितीचा अधिकार राज्यघटनेच्या कलम १९(१) (क) मधील भाशण व अभिव्यक्ती स्वांतत्र्यात असल्याचा निर्वाळा वेळोवेळी भारतीय न्यायालयांनी दिला आहे. तर सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या अनेक संस्था संघटनांनी सामाजिक न्यायाची अंमलबजावणी करण्यासाठी माहितीचा अधिकार आवष्यक मानला एकुणच शासनाने आंतरराष्ट्रीय धोरणे न्यायालयांचे निर्णय व नागरी संघटनांचा वाढता दबाव यांच्यामळे या कायद्याचा निर्मितीला गती दिली. परिणामस्वरूप माहितीचा अधिकार कायदा अस्तित्वात आला. भारतातील माहितीचा अधिकार कायद्याच्या निर्मितीची प्रक्रिया खालील सर्व बाबी समोर ठेवून आपल्याला समजून घ्यावी लागते.

**१) गुप्ततेची परंपरा :–**

काही अल्प लोकांच्या हाती सत्ता देऊन स्वराज्य साकार होणार नाही, तर जेव्हा सत्तेच्या दुरूपयोगाला विरोध करण्याचे सामर्थ्य सर्व जनतेमध्ये येईल तेव्हाच खरे स्वराज्य साकार होईल. —महात्मा गांधी

भारतीय प्रशासनाला गुप्ततेची परंपरा कायम आहे. शासकीय गुपीतांचा कायदा १९२३ हा मुख्यत: संरक्षण यंत्रणेतील महत्वाची स्थळे आणि देशाच्या सुरक्षिततेशी निगडीत असणारी माहिती देण्यावर असणाऱ्या निर्बधाबाबतचा कायदा आहे. परंतु देषाच्या एखाद्या व्यक्तीच्या सुरक्षेशी ज्याच्या संबंध नाही अशा सर्वच माहितीला हा कायदा लागु आहे. असा समज सर्वत्र रूढ करण्यात आला ज्या माहितीच्या प्रगटीकरणामुळे सार्वजनिक हिताला धोका पोहचणार नाही. अषा माहितीलाही हा कायदा सर्रास लावला गेला लोकशाही राज्य कारभाराची व कल्याणकारी राज्य व्यवस्थेची सर्व प्रकारची माहिती अषीच गोपनियतेच्या वलयात अडकून राहीली आणि भारत देश स्वंतत्र झाल्यानंतरही ब्रिटीशांनी सुरू केलेली प्रशासनाची वसाहतवादी चौकट व गोपनियतेची मानसिकता बहुतांश क्षेत्रात कायम राहीली.

**'महात्मा गांधी यांच्या नजरेतून :–**

आपलेकडे येणारे नागरिक हे फार मोलाचे आहेत. नागरिक हे आपल्यासाठी नसून आपण व्यत्यय नसून ते आपल्या कामाचा गाभा आहेत. नागरिक कोणी परके नसून ते खऱ्या अर्थाने आपले आधारस्तंभ आहेत. त्यांना माहिती व कल्याणकारी सेवा पुरवून आपण उपकार करीत नाही. तर सेवा करण्याची संधी देऊन तेच आपल्या सर्वांना आकृत करीत आहेत.

माहितीच्या अधिकारामुळे पारदर्शकता उत्तरदायित्व व लोकसहभाग या शब्दांना नव्याने अर्थप्राप्त झाला आहे. माहितीचा अधिकार कायदा हा गांधीजींची विश्वस्त ही संकल्पना स्वीकारतो या संकल्पनेनुसार शासनकर्ते सार्वजनिक संस्थमधील माहितीचे मालक नसून ते केवळ विश्वस्त आहेत.

**२) आंतरराष्ट्रीय संदर्भ :–**

माहितीच्या अधिकाराचा आंतरराष्ट्रीय इतिहास पाहताना जगभर स्विकारलेले महत्वाचे तत्व म्हणजे शासन व सर्व शासकीय संस्थाकडे असणारी माहिती ही सार्वजनिक स्वरूपाची असते. ती मागण्याचा व पाहण्याचा नागरिकांना अधिकार असतो. आणि केवळ समर्थनीय करण्यासाठीच ती राखून ठेवली जावू शकते असा व अधिकार स्विकारण्यामध्ये स्विडन हा देश सर्वाज आघाडीवर असल्याचे दिसते. १७६६ मध्ये थ्ममकवउ व ि च्तमे ।बज असा कायदा करून स्विडनमध्ये माहितीचा अधिकार सर्वप्रथम मान्य करण्यात आला. संयुक्त राष्ट्रसंघाने या कायद्याच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर धोरणात्मक भुमिका बजावली आहे. आमसभेच्या पहिल्या अधिवेशनात १९४६ मध्ये युनिव्हर्सल डिक्लरेशन ऑफ हयुमन राईट्स मध्ये संमत केलेल्या ठरावात असे स्पष्ट केले आहे की, नागरिकांचे माहिती मिळवण्याचे स्वातंत्र्य हा मुलभूत मानवाधिकार असून तो संयुक्त राष्ट्रांनी मान्यता दिलेल्या स्वातत्र्यांची आधारशिला आहे.

**३) राष्ट्रीय संदर्भ :–**

राज्य घटनेतील कलम २१ मधील जगण्याचा स्वातंत्र्याचा अर्थ लावताना भारतीय न्यायालयाने अनेक महत्वाच्या निवाडयात मुलभूत अधिकारांचा विस्तार केला आणि माहितीचा अधिकार याच पध्दतीने मुलभूत अधिकारात समाविष्ठ असल्याचे स्पष्ट केले आहे. म्हणूनच माहिती अधिकाराच्या कायद्याच्या इतिहासात नागरिकांच्या मुलभूत हक्काचे रक्षण करणाऱ्या न्यायव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा सहभाग आहे.

**४) महत्वाचे न्यायनिवाडे :–**

**माहितीचा अधिकार कायदा, २००५ च्या इतिहासातील महत्वाचे न्यायनिवाडे**

| अ.क्र. | तपशील | दिनांक |
|---|---|---|
| १. | बेनेट कोलमन विरुध्द युनियन ऑफ इंडिया | ए.आय.आर., १९७३, सर्वोच्च न्यायालय ६० |
| २. | उत्तर प्रदेश विरूध्द राज नारायण व इतर | १९७५ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०४२८ |
| ३. | मनेका गांधी विरुध्द युनियन ऑफ़ इंडिया | (१९७८ ए.आय.आर. ५९७, १९७८ सुप्रीम कोर्ट रिपोर्टर (२) ६२१ ) |
| ४. | श्रीमती प्रभा दत्त विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर | १९८२ (००१) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०००१ |
| ५. | एस. पी. गुप्ता विरुध्द युनियन ऑफ इंडिया | ए.आय.आर. १९८२ सर्वोच्च न्यायालय (१४९). |
| ६. | इंडियन एक्सप्रेस न्यूजपेपर्स प्रा. लि. व इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर | १९८५ (००१) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०६४१ |
| ७. | शीला बारसे विरूध्द महाराष्ट्र शासन | १९८७ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०३७३ |
| ८. | रिलायंस पेट्रोकेमिकल्स लिमिटेड विरुध्द प्रोप्रायटर्स ऑफ़ इंडियन एक्स्प्रेस न्युजपेपर्स प्रा. लि. व इतर | (१९८८ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०५९२ ) |
| ९. | लाईफ इनश्युरन्स कार्पोरेशन ऑफ इंडिया विरूध्द प्रो. मनुभाई डी. शाह | १९९२ (००३) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०६३७ |
| १०. | सेक्रेटरी,मिनिस्ट्री ऑफ इन्फर्मेशन अँन्ड ब्रॉडकास्टिंग, गव्हर्न्मेंट ऑफ इंडिया व इतर विरुध्द क्रिकेट असोसिएशन ऑफ बंगाल व इतर | १९९५ (००२) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१६१ |
| ११. | टाटा प्रेस लिमिटेड विरुध्द महानगर टेलिफोन निगम लिमिटेड व इ तर | १९९५ (००५) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१३९ |
| १२. | दिनेश त्रिवेदी, एम.पी. व इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर | १९९७ (००४) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०३०६ |
| १३. | युनियन ऑफ इंडिया व इतर विरूध्द मोशन पिक्चर असोसिएशन व इतर | १९९९ (००६) सर्वोच्च न्यायालय प्रकरण ०१५० |
| १४. | पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरूध्द युनियन ऑफ इंडिया (२००४[२] सर्वोच्च न्यायालय प्रकरण ४७६) | २३-१२-२००४ (ए.आय.आर., १९७३, सर्वोच्च न्यायालय ६० |

१९७३ बेनेट कोलमन वि. युनियन ऑफ इंडिया १९७५ साली उत्तरप्रदेश शासन विरूध्द राजनारायण व इतर ¼004½ SCC 0428 SC) मनेका गांधी विरूध्द युनियन ऑफ इंडिया १९७८ AIR 597, 1978 SCR (2) 621),

1982 मधील एस.पी.गुप्ता विरूध्द युनियन ऑफ इंडिया AIR 1982 SC (149) इंडियन एक्सप्रेस न्युजपेपर्स प्रा. लि. इतर विरूध्द युनियन ऑफ इंडिया व इतर १९८५ (001½ SCC 0641 SC रिलायन्स पेट्रोकेमिकल्स लिमीटेड विरूध्द प्रोप्रायटर्स ऑफ इंडियन एक्सप्रेस न्युजपेपर्स प्रा.लि. व इतर (1988 (004) SCC0592 SC) पीपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टी विरूध्द युनियन ऑफ इंडिया (2004(2) SCC 476)

वरील सर्व न्यायनिवाडयामध्ये कल्याणकारी राज्य व शासनाच्या अधिकाराच्या वापरावरील नागरिकांच्या आवश्यक अंवुशाबाबत भाष्य करण्यात आले आहे. तात्पर्य काय तर नागरिकांचे उच्चार व अभिव्यक्ती स्वातंत्र हे माहितीच्या अधिकार ध्वनित करतात व प्रगल्भ लोकशाहीसाठी ते आवश्यक असतात. म्हणूनच सर्वसामान्य स्वरूपाची माहिती सर्वानाच सहजपणे उपलब्ध झाली पाहीजे असे माहितीच्या अधिकार कायद्यात अपेक्षित आहे.

५) माहितीचा अधिकार कायदा २००५ संसदीय प्रवास.

| माहितीचा अधिकार कायदा, २००५ संसदीय प्रवास | | |
|---|---|---|
| **अ.क्र** | **तपशील** | **दिनांक** |
| १ | माहिती अधिकार विधेयक लोकसभेत सादर | २३-१२-२००६ |
| २ | माहिती अधिकार कायदा २००५ लोकसभेत संमत | ११-०५-२००५ |
| ३ | कायद्याला राष्ट्रपतींची संमती व अंशत: कायद्यातील काही तरदी लागू | १५-०६-२००५ |
| ४ | माहितीचा अधिकार कायदा, २००५ केंद्रशासनाच्या राजपत्रात प्रसिध्द | २१-०६-२००५ |
| ५ | जम्मू काश्मीर वगळता देशभर संपूर्ण कायदा लागू | १२-१०-२००५ |

**मुल्यमापन:—**

भारत देशाच्या प्रत्येक तरूण हा देश विकासाचा धागा आहे. त्यामुळे भारतीय राजकीय क्षेत्र याविषयी माहिती जाणून घेताना मानवी मुलभूत हक्काची जाणिव यातून व्हावी तसेच माहितीच्या अधिकार २००५ यामधून महत्वपुर्ण अशा घटकांची माहिती प्राप्त व्हावी तसेच स्वत:च्या हक्काची तसेच कर्तव्याची जाणिव त्यांना व्हावी यासाठी मानवी हक्क आणि माहितीचा अधिकार कायद्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी याविषयी चर्चा व निवड करण्यात आली.

१) जास्तीत जास्त माहिती खुली करणे व अवयावत करून सतत प्रसारित करणे.
२) मानवी हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव व्हावी.
३) शासन व्यवहारात पारदर्शकता व खुलेपणा
४) विहित कालावधीत अर्ज व अपिलावर निर्णय घेण्याचे बंधन.
५) सार्वजनिक हिताला सर्वोच प्राधान्य
६) सदभावनेने केलेल्या कामाला संरक्षण
७) एखाद्या व्यक्तीचे जीवीत व स्वातंत्र्य या सबंधातील माहिती तिची मागणी केल्यापासून ४८ तासात पुरविण्याची तरतूद.

**संदर्भ :**

लोटे, रा.ज.— भारतीय लोकशाही पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स नागपूर

गोखले, रा.म.— आधुनिक राज्यशास्त्र भाग १ व २ कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे

लोटे, रा.ज. —भारतीय राजकीय विचार पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

देशमुख, बि.टी — भारतीय संविधान पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूरे

माहितीचा अधिकार आणि महत्वाच्या संकल्पना — सार्वजनिक धोरण केंद्र यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी पुणे